विभागीय चौकशी सुरु करणे कामी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करणे बाबत.(श्री.राजेश एकनाथ तगरे, तात्कालिन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत बेलापूर बु. तालुका श्रीरामपूर)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/२२९ /२०२५
दिनांक- स्वाक्षरी खाली नमूद केलेप्रमाणे

संदर्भ- १. या कार्यालयाचे आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/२३८ /२०२४ दिनांक ०३/०६/२०२४ (सेवा निलंबन आदेश)

२.या कार्यालयाचे दोषारोप ज्ञापन दिनांक ग्रापं-३/२४१/२०२४ दिनांक ०३/०६/२०२४

३. मु.का.अ.यांचे पत्र ग्रांप-३/७८८७९३/२०२५ दिनांक १३/०१/२०२५ (पुर्ननिरीक्षण चौकशी अहवालाची तपासणी करणे व आवश्यकता असल्यास सुधारित दोषारोप पत्र तयार करुन सादर करणे बाबत पत्र)

४. गट विकास अधिकारी श्रीरामपूर यांचे आस्था२/१५८/२०२४ दिनांक ०७/०३/२०२५ (सुधारीत दोषारोप अहवाल)

५. या कार्यालयाचे दोषारोप ज्ञापन दिनांक ग्रापं-३/१३७६८०६/२०२५ दिनांक २७/०६/२०२५.

६. श्री.राजेश एकनाथ तगरे,ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत बेलापूर बु.,तालुका श्रीरामपूर यांचा खुलासा दिनांक ३१/०७/२०२५.

७. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (६)(३)

८. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (६)(५)

ज्याअर्थी श्री.राजेश एकनाथ तगरे,ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत बेलापूर बु.,तालुका श्रीरामपूर यांचे कार्यालयीन कामकाजात ग्रामपंचायत बेलापूर बु.,येथील ग्रामसभा न घेणे याप्रकारचे गैरवर्तन व अपहार केल्याने याबाबत संदर्भ क्रमांक ०५ अन्वये एकूण ०९ दोषारोप ठेवून दोषारोपांचे ज्ञापन त्यांना बजावण्यात आलेले आहे. संदर्भ क्रमांक ०६ अन्वये श्री.राजेश एकनाथ तगरे यांनी त्यांना देण्यात आलेल्या दोषारोपांचा खुलासा कार्यालयास सादर केलेला असुन त्यांचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप त्यांनी अमान्य केलेले आहे. सदर दोषारोप प्रकरणी श्री.राजेश एकनाथ तगरे यांना म्हणणे सादर करण्याची संधी देणे, न्याय हक्काचे दृष्टीने सर्व आरोपांबाबत विभागीय चौकशी करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ च्या तरतुदींनुसार श्री.राजेश एकनाथ तगरे,तात्कालिन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत बेलापूर बु.,तालुका श्रीरामपूर यांचेवर ठेवण्यात आलेल्या ०९ दोषारोप संदर्भात खाते निहाय विभागीय चौकशी करण्याचे आदेश देण्यात येत आहेत.

या आदेशान्वये सदर विभागीय चौकशी करणे कामी चौकशी अधिकारी म्हणून सहा.आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग नाशिक यांची व सादरकर्ता अधिकारी म्हणून जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचे वतीने श्री.दिनकर गणेश ठाकरे विस्तार अधिकारी (सांख्यिकी) पंचायत समिती श्रीरामपूर यांची नियुक्ती करणेत येत आहे.

नियुक्त सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे. त्याच प्रमाणे श्री.राजेश एकनाथ तगरे यांचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपांचे आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा

परिषदेची सक्षम प्रकारे बाजू मांडावी. विभागीय चौकशी वेळेत पुर्ण करणे कामी आवश्यक ते सर्व कामकाज नियमाप्रमाणे करावे व होणा-या प्रत्येक सुनावणीस नियुक्त सादरकर्ता अधिकारी यांनी उपस्थीत रहावे.

विभागीय चौकशी प्रकरणी चे कामकाजात टाळाटाळ करण्याचे गैरवर्तन केल्याचे निदर्शनास आल्यास सादर कर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी. या खाते निहाय विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागू राहतील.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 202510070601340 असा आहे.

**Signed by Anand Subhashlal Bhandari**
**Date: 07-10-2025 20:33:52**

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१) सहा.आयुक्त, (चौकशी) विभागीय आयुक्त कार्यालय,नाशिक विभाग, नाशिक

२/- सोबत श्री.राजेश एकनाथ तगरे, ग्रामपंचायत अधिकारी, यांचे गैरवर्तनाबाबतचे दोषारोप समवेत जोडले आहे.

प्रति :- २) श्री.दिनकर गणेश ठाकरे विस्तार अधिकारी (सांख्यिकी) पंचायत समिती श्रीरामपूर
व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपूर

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले/अहिल्यानगर
२/- सोबतचा आदेश श्री.राजेश एकनाथ तगरे,ग्रामपंचायत अधिकारी,यांना बजावून तो मिळालेबाबतची पोहोच या कार्यालयास सादर करावी.

(स्वाक्षरीत /-)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर